महापालिका सहाय्यक आयुक्त, येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका
कार्यालयाचा पत्ता- हॉटेल सरगम समोर, येरवडा पुणे ४११००६.
कार्यालयाचा संपर्क क्र. ०२०२५५०९१०० Email id- yerwada@punecorporation.org

जावक क्र. :- ६११४
दिनांक :- १२/०३/२०२१

## कोविड-१९ सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र आदेश

विषय- कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) आजाराच्या अनुषंगाने प्रतिबंधित क्षेत्र (Micro Containment Zone) सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र घोषित करणेबाबत.

संदर्भ- १)साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसूचना दि. १३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम, २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना-२०२०/५८ आरोग्य ५ दि. १३/०३/२०२०.

माहे फेब्रुवारीच्या प्रथम सप्ताहापासुन (कोव्हिड-१९) च्या रुग्ण वाढीचा दर वाढलेला असून त्यामुळे कोरोना विषाणूची दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदयस्थितीमध्ये येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील खालील ठिकाणी कोव्हिड-१९ विषाणूचा संसर्ग वाढत असल्याने रूग्ण आढळुन येत आहे.

| अ.क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नाव | प्रभाग क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नाव | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालय | १ | आकाश पार्क धानोरी | दि. १२/०३/२०२१ ते दि. २५/०३/२०२१ |
| २ | येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालय | २ | उत्तम टाउनस्केप डी-२, डी-४ | दि. १२/०३/२०२१ ते दि. २५/०३/२०२१ |
| ३ | येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालय | ६ | हरी गंगा सोसायटी बी-१, बी-३ | दि. १२/०३/२०२१ ते दि. २५/०३/२०२१ |

तरी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी सदरचा परिसर हा (Micro Containment Zone) सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र घोषित करण्यात येत आहे. वरील परिसर व त्याच्या आजूबाजूच्या परिसरात राहणा-या नागरिकांनी खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

१.सोसायटी/ घर/ बंगला/ चाळ/ ऑफिस इ. ठिकाणी राहणा-या नागरिकांनी/ काम करणा-या कर्मचा-यांनी त्यांच्या आवारात/ घरी/ ऑफिस मध्ये भेट देणा-या प्रत्येक व्यक्तींचे पल्स ऑक्सिमीटर आणि थर्मल डिटेक्टरच्या सहाय्याने तपासणी केली जावी. कोव्हिडसाठी पल्स ऑक्सिमीटर तपासणी ही दिशादर्शक आहे. ज्या व्यक्तीची ओ-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ च्या खाली असल्यास त्यास त्वरीत पुढील तपासणी करीता महापालिकेची रूग्णालये अथवा खाजगी डॉक्टर यांचेमार्फत तपासणी करून घेणेतबाबतची सूचना देण्यात यावी.

२. सोसायटी/ घर/ बंगला/ चाळ/ ऑफिस इ. ठिकाणी राहणा-या / काम करणा-या ज्येष्ठ / १० वर्षाखालील मुले / आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ती यांची पल्स ऑक्सिमीटरदवारे तपासणी करून

त्यांची नोंद ठेवण्यात यावी. या अनुषंगाने ज्या व्यक्तींची ओ-२ सॅच्युरेशन लेव्हल ही ९४ किंवा त्या खाली आल्यास अशा व्यक्तींची डॉक्टरांच्या सल्ल्याने तात्काळ स्वॅब सेंटर करून घेण्यात यावी. स्वॅब टेस्ट करणेकरीता येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालयामार्फत कै. गेनबा म्हस्के कळस दवाखाना कळसगाव या ठिकाणी मोफत सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास आपण आपले परिसरातील आरोग्य निरीक्षक यांचेशी संपर्क साधावा.

३. आपले सोसायटी/ घर/ बंगला/ चाळ/ ऑफिस इ. ठिकाणी कोव्हिड १९ व्यतिरिक्त इतर आजारांकरीता रूग्णालयात दाखल असणा-या रूग्णांबाबतची माहिती कृपया yerwada@punecorporation.org या ईमेल वर उपलब्ध करून दयावी जेणेकरून केवळ कोव्हिड- १९ चे अनुषंगाने माहितीचे विश्लेषण करून वैदयकीय विभागामार्फत पुढील मदत उपलब्ध करून देता येईल.

४. सोसायटी/ घर/ बंगला/ चाळ/ ऑफिस इ. ठिकाणी सोशल डिस्टन्सिंगचे पालन केले जाईल व प्रत्येक व्यक्ती मास्कचा वापर करेल याबाबतची दक्षता घ्यावी.

तरी वरील सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

12.03.2021.

(वैभव कडलख)
महापालिका सहाय्यक आयुक्त
तथा सनियंत्रण अधिकारी
येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीकरीता..........
१)मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) पुणे महानगरपालिका
२) मा. सहाय्यक आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका
३) मा. उप आयुक्त परिमंडळ क्र. १ पुणे महानगरपालिका
४) समन्वयक डी.पी.सेल, पुणे महानगरपालिका
५) मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्रांतवाडी पुणे
६) मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शास्त्रीनगर येरवडा पुणे
७) संबंधित आरोग्य निरीक्षक